# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

जा.क्र.2020/गो.शा.1/करोना/कावी दिनांक 19/04/2020.

संदर्भ : 1.या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144/कावी –दिनांक 13/04/2020.
2..महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक 17/04/2020.

**आदेश**

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना (कोव्हीड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात,महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्य शासनाने करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 कायदयातील खंड 2,3 व 4 मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच भारत सरकार आरोग्य मंत्रालय महाराष्ट्र शासन आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केल्याप्रमाणे करोनाग्रस्त रुग्णाचे इतर लोकांनी संपर्कात येऊ नये तसेच सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे इत्यादी बाबीमुळे या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्व सामान्य जनतेस व त्यांच्या आरोग्यास धोका होऊ नये या करीत या कार्यालयाचे संदर्भ क्र. 1 च्या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये मनाई आदेश काढण्यात आले होते.

संदर्भ 2 अन्वये राज्य शासनाने लाकडाऊन संदर्भात नवीन सर्व समावेश अधिसुचना जारी केली असुन या अतिरिक्त औद्योगिक घटकासह शेती विषयक बाबी बाधकाम क्षेत्र आदीना अधिक सुट देण्यात आली आहे. तसेच सोशल डिस्टींगच्या नियमाचे पालन करुन मनरेगा अंतग्रत कामे करण्याच्या समावेश या अधिसुचनेत करण्यात आला आहे. तसेच राज्य शासकीय कार्यालयामध्ये 10 टक्के अधिकारी/ कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच जनतेच्या अडचणी जाणुन **दिनाक 20 एप्रील 2020** पासुन काही सेवाना लॉकडाऊन मधुन सुट दिली आहे.

त्याअर्थी, मी रुचेश जयवंशी , जिल्हादंडाधिकारी हिंगोली खालील नमुद सेवाना **दिनांक 20/04/2020 पासुन** सुरु ठेवण्याकरीता या आदेशाद्वारे परवानगी देत आहे.

1. सर्व प्रकारचे वस्तु , माल, घेवुन जाणारे ट्रक तसेच इतर वाहने यांना दोन चालक व एक मदतनीस यांच्यासह प्रवास करण्याची परवानगी असेल परंतु वाहन चालक यांच्या कडे वैध वाहन परवाना आवश्यक असेल तसेच माल वस्तु याची पोहच केल्यानतर रिकामा ट्रक / वाहन परत घेवुन जाण्यास परवानगी असेल.
2. ट्रक दुरुस्तीची दुकाने सुरु ठेवता येतील परंतु केंद्र आणी राज्य शासनाने सोशल डिस्टंसिंगचे घालुन दिलेले नियम पाळणे आवश्यक असेल.

या आदेशाद्वारे विहित करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधाची किंवा काढलेला आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्ती विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या कलम अन्वये कार्यवाही करण्यात येईल तसेच त्या व्यक्तीने भारतीय दंड संहिता (1960 चा 45) यांच्या कलम 188 अन्वये शिक्षा पात्र असलेल्या अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक 19/04/2020 रोजी माझ्या स्वाक्षरी व शिक्या निशी निर्गमित करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
(रुचेश जयवंशी ) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हिंगोली.

**प्रतिलिपी : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

1. मा. प्रधान सचिव, म.शा. सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांना माहितीस्तव.
2. मा. विभागीय आयुक्त, औरगाबाद यांना माहितीस्तव.



Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450


3. पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्त.
4. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, हिंगोली.
5. जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली.
6. उपविभागीय दंडाधिकारी, हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा /सेनगांव.
7. तालुका कार्यकारी दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा /सेनगांव
8. सर्व मुख्याधिकारी, नगरपालीका/नगरपंचायत जि. हिंगोली.
9. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली.

(रुचेश जयवंशी ) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हिंगोली.

Scanned by CamScanner